# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in

---

जा.क्र.तंशिविकापु/विवि/मनसे/तक्रार/२०१८/5313 दिनांक : 15 DEC 2018

प्रति,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या,
सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रमाच्या तंत्रशिक्षण संस्था.

**विषय :- सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षांची राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करणेबाबत..**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे आदेश क्रमांक १, दिनांक ०२.०८.२०१८.
२. या कार्यालयाचे आदेश क्रमांक २, दिनांक १८.०८.२०१८.
३. या कार्यालयाचे आदेश क्रमांक ३, दिनांक १०.०९.२०१८.
४. या कार्यालयाचे आदेश क्रमांक ४, दिनांक १५.०९.२०१८.
५. या कार्यालयाचे आदेश क्रमांक ५, दिनांक २०.१०.२०१८.
६. या कार्यालयाचे आदेश क्रमांक ६, दिनांक २६.१०.२०१८.
७. या कार्यालयाचे आदेश क्रमांक ७, दिनांक २९.१०.२०१८.
८. या कार्यालयाचे आदेश क्रमांक ८, दिनांक १७.११.२०१८.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, या विभागाच्या अखत्यारीतील सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षांत राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची रक्कम, मिळण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याकरीता, वरील संदर्भिय आदेशान्वये संबंधित संस्थांना प्रदान करण्यात आलेली आहे.

तथापि ब-याच संस्थांनी, सदर शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा केलेली नाही असे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आढळून आले आहे. तरी ज्या संस्थांनी राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची रक्कम, अद्याप पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा केलेली नाही. अशा संस्थांनी याबाबत त्वरीत कार्यवाही करुन, सदरची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर तात्काळ जमा करावी व **उपयोगिता प्रमाणपत्रे** या कार्यालयास **दिनांक १५ जानेवारी, २०१८ पर्यंत** सादर करावीत.

तसेच ज्या संस्था विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या रकमेचे वाटप करणार नाहीत, अशा संस्थांविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यास सदर संस्थेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.